(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

क्रमांक : पोमसं/३-अ/पदो-पोनिबिसं(अभि.)/७४/२०१९
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई-४०० ००१.
दि. ११/०२/२०२१.

वाचा:-
१. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, अर्धशासकिय पत्र क्र. पीएमएन-०१०९/ क्र.५१५/ पोल-५ब, दि.०६/०७/२००९.
२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र. पीएमएन-०१०९/प्र.क्र.५१५/पोल-५ब, दि.१०/०८/२००९ व
३. सन २०१४, महाराष्ट्र अधिनियम क्र.१४, दि.२५ जून २०१४ व सन२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.११ दि.०६ एप्रिल २०१५
४. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. १५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, आणि अधिसूचना सुधारणा दि.१६/०७/२०१५ व दि.१५/०६/२०१७.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१० /कार्या. १२, दि.१५/१२/२०१७, दि.३०/०८/२०१८.
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ /१६-ब, दि.२९/१२/२०१७.
७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि. ०१/०८/२०१९.

**-: आदेश :-**

शासनाने संदर्भ क्र.०६ मध्ये नमूद केलेल्या दि.२९/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन आरक्षण नसलेल्या खुल्या प्रवर्गातील तसेच इतर मागासवर्गीय प्रवर्गातील पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्याचा विभागीय पदोन्नती समितीने निर्णय घेतला आहे.

२. शासनाने संदर्भ क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या दिनांक १५/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे खुल्या प्रवर्गातील तसेच इतर मागास प्रवर्गातील पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक बि.सं. (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रापात्रता तपासण्यात आली असता, खालील नमूद ०९ पोलीस उपनिरीक्षक बि.सं. (अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरविले आहे. शासनाने संदर्भ क्र. ०४ मध्ये नमूद केलेल्या महसूली विभाग वाटप नियमानुसार पात्र ठरलेल्या पोलीस निरीक्षक बि.सं. (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने महसुल विभागाचे वाटप केले आहे. खालील नमूद पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्यासाठी तसेच, महसुल विभागाच्या वाटपास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

३. उपरोक्त संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र पोलीस अधिनियम,१९५१ मधील कलम-२२ न चे पोटकलम (२) व त्याखालील सुधारित स्पष्टीकरणानुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांका पासून **"पोलीस निरीक्षक बि.सं. (अभियांत्रिकी)"** पदावर **तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ मधील घटकांत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक बि.सं. (अभियांत्रिकी) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल संवर्ग | पोलीस निरीक्षक बि.सं. (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | धनंजय शिवशंकर भर्ले | पुणे शहर | पुणे | रारापोबल,गट क्र.२,पुणे |
| २. | महेंद्र दत्तात्रय कोरे | अपोमसं. बि.सं.वि.पुणे | पुणे | रारापोबल,गट क्र.७,दौंड |
| ३. | जयकुमार हरी पाटील | नाशिक परिक्षेत्र | कोकण-२ | रारापोबल,गट क्र.८,मुंबई |
| ४. | अनिलकुमार बबनराव अंबिके | मुंबई शहर | पुणे | संचालक, बिनतारी संदेश, पुणे |
| ५. | दत्तात्रय तुकाराम काळोखे | मुंबई शहर | पुणे | संचालक, बिनतारी संदेश, पुणे |
| ६. | विजय माधवराव मोहिते | नागपूर शहर | नागपूर | नागपूर परिक्षेत्र |
| ७. | शिरीष भालचंद्र बेगडे | बीड | पुणे | रारापोबल,गट क्र.१०, सोलापूर |
| ८. | आबासाहेब जिजाबा सुंबे | सातारा | पुणे | कोल्हापूर |
| ९. | धनंजय बबनराव ताम्हाणे | अहमदनगर | नागपूर | रारापोबल,गट क्र.४, नागपूर |

४. उपरोक्त पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, आणि कार्यमुक्त केल्याचा, तसेच पोलीस निरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक कृपया **तातडीने** हया कार्यालयास कळवावा.

५. वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांचे विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कार्यवाही केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असले / सौम्य शिक्षेची अमंलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तसेच त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसेल तर संबंधित घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलद्वारे / फॅक्सद्वारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.

६. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधिन दिनांक २९/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. पदोन्नती झालेल्या पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यापूर्वी ते ज्या घटकांत जाणार आहेत, त्या घटक प्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. रिक्त पद नसल्यास तसे हया कार्यालयास कळवावे.

८. सदर पदोन्नती आदेशांमधील पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) हे जर आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकांत कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

९. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

पदोन्नत झालेल्या सर्व पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(अभियांत्रिकी) यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.

**हेमंत नगराळे**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, पुणे शहर/ नागपूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर./ नाशिक परिक्षेत्र
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर/बीड/ सातारा/ अहमदनगर.
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, रारापोबल, गट क्र. २,पुणे / गट क्र.४, नागपूर / गट क्र.७,दौंड/ गट क्र.८,मुंबई/ गट क्र.१०, सोलापूर.

**प्रत,**

अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत सस्नेह सादर,**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, मुंबई-१/ नागपूर-२.
कार्यासन अधिकारी, का.क्र. ०९/११-अ/३६/४०.
पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, कार्यालय म.राज्य., मुंबई
२/- यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर WWW.mahapolice.gov.in येथे एक महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

11/2/21

**( कुलवंत कु. सारंगल)**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता